Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – II August 2016

# जागतिक शिक्षण प्रणालीत भारतीय शैक्षणिक विचारांची समर्पकता

(म. गांधीच्या स्वावलंबी शिक्षण प्रणालीच्या संदर्भात)

**डॉ. शेख एस. जे.,**
**प्राचार्य,**
**शिक्षणशास्त्र महाविदयालय, चोपडा**
**ता. चोपडा जि. जळगांव.**

मोहनदास करमचंद गांधी ज्यांना महात्मा, बापू, मसीहा अशा वेगवेगळया नावांनी ओळखले जाते. महात्मा गांधी म्हणजे सर्व जगाला परिचीत असलेले प्रभावी व प्रेरणात्मक व्यक्तिमत्व होय. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधी होय. गांधीजी भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या विचारांनी प्रभावित केले त्यांच्या विचारांमुळेच आज २ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस जागतिक अहिंसा दिवस म्हणून ही साजरा केला जातो. गांधीजी नी शिक्षणात नई तालीम सोबतच ३H (Head, Heart and Hand - बुध्दि, ह्रदय आणि हात) ही संकल्पना मांडली.

स्वातंत्र्य संग्रामात अहिंसेचा मार्ग जोपासणारी, सत्यचा आग्रह धरणारी, भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी तळमळणारी ही प्रभावी व्यक्ती केवळ राजकीय क्षेत्रातच सक्रिय नव्हती तर स्वतंत्र भारताला विकसीत करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे जाणून शैक्षणिक क्षेत्रातही तेवढीच सक्रिय होती. राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी त्यांनी मूलोदयोगी शिक्षण पध्दती अस्तित्वात आणली होती. या पध्दतीच्या तत्वांचा उपयोग आजही व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात केला जात आहे. महात्मा गांधींनी विविध सभांमध्ये आपले शिक्षण विषयक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते शिक्षणाचा अर्थ खालील प्रमाणे सांगता येईल.

महात्मा गांधी नी शिक्षणाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण म्हणता येणार नाही, शिक्षणाची सुरुवात पण नाही, तर माणसाच्या शारीरीक, मानसिक व आध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय".

१९३७ रोजी वर्धा येथे एक सभा बोलविण्यात आली होती. त्या सभेत त्यांनी 'नई तालीम', 'बुनियादी शिक्षा', 'मुलोदयोगी शिक्षण' यांचा पुरस्कार केला होता. यावरुन शिक्षण म्हणजे माणूस घडविणे हा विचार गांधीजींनी मांडलेला दिसून येतो. महात्मा गांधीनी शिक्षणाचा दृष्टीकोन मांडतांना म्हटले होते की, केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. म्हणून बालकांच्या शिक्षणाची सुरुवात त्याला उत्पादन कार्याचे बाळकटू पाजूनच मी करेन.

भारतीय शिक्षणपध्दतीतत संपूर्ण क्रांती घडवून आणणारा असाच हा दृष्टीकोन समजला पाहिजे. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, प्रत्येक व्यक्तीने आपल्यातील सुप्त उत्पादकशक्ती प्रथमपासूनच पणाला लावावी व आपल्या आर्थिक स्वावलंबनाचा पाया घालावा. ज्ञानेंद्रियांच्याद्वारे औद्योगिक किंवा हस्त व्यवसायांचे शिक्षण व या शिक्षणाबरोबरच प्राप्त होणारे हस्त कौशल्य हा भावी जीवनचा पाया ठरावा या इतकका खोल विचार गांधीजींच्या मूलभूत शिक्षणात अभिप्रेत आहे. जीवन व शिक्षण ही अविभाज्य होत असे ते म्हणत, याचा अर्थ यामुळे स्पष्ट होतो.

**महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार :--**

महात्मा गांधींनी शिक्षणक्षेत्रासाठी आयुष्यभर जे कार्य केले व ते विविध प्रयोग केले त्यातूनच त्यांचे शैक्षणिक विचार तसेच शैक्षणिक तत्वज्ञान स्पष्ट होते. ते विचार खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) सर्वांगिण विकास :--**

गांधीजींच्या मते ज्या शिक्षणातून व्यक्तीचा खरा विकास होतो तेच खरे शिक्षण होय. गांधीजींनी केवळ बौध्दिक विकासार भर न देता व्यक्तीमत्वाच्या सर्व घटकांवर भर दिला आहे. त्यांनी त्यासाठीही ३ H ही संकल्पना मांडली. ३ H म्हणजे Head, Hand, आणि Heart होय. त्यांच्या मते या ३ H शिक्षणातूतन व्यक्तीचा ज्ञानात्मक विकास होतो.

**२) स्वावलंबी शिक्षण :--**

गांधीजींच्या मते बालक शिक्षणातून स्वावलंबी बनले पाहिजे. त्यांच्या मते, विद्यार्थ्यांना शाळेतच वस्तू तयार करण्याचे शिक्षण देण्यात यावे. सात - आठ वर्षाच्या काळात वस्तू तयार करण्यास बालक सक्षम झाल्यावर त्यावर झालेला खर्च वस्तू विक्रीतून करता येईल आणि उर्वरीत झालेल्या उत्पन्नाचा विनियोग करता येईल. म्हणून स्वावलंबी शिक्षणाने बालकाचा विकास होऊन तो स्वतः आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि बौध्दीक रुपाने स्वावलंबी होईल.

**३) मूलोदयोगी शिक्षण :--**

गांधीजींच्या मते शिक्षणात हस्तव्यवसाय किंवा एखादा उदयो हा प्रमुख विषय असावा असे नव्हे, तर ते शिक्षणाचे माध्यम असावे हा व्यवसाय म्हणजे मूलोदयोग असे गांधीजींचे मत होते. मूलोदयोगाचा शिक्षणात अंतर्भाव करतांना तो त्या प्रदेशाच्या भौगोलिक व सामाजीक परिस्थितीवर अवलंबून असावा आणि या मूलोदयोगी शिक्षणाने दोन उद्देश साध्य व्हावेत. १) विद्यार्थ्यांच्या क्रियाशिलतेला चालना देणे. २) जीवनोपयोगी शिक्षण

**४) देशाच्या गरजानुसार शिक्षण :--**

गांधीजींनीं शिक्षणविषयक विचार मांडतांना ग्रामीण भागाचा जास्त विचार केला आहे. आणि ते योग्य

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – II August 2016

आहे. जोपर्यंत शिक्षण हे स्वविकासाबरोबर समाजाचा विकास व त्याद्वारे राष्ट्राचा विकास साधू शकत नाही. तो पर्यंत शिक्षणाला अर्थ नाही म्हणून ग्रामीण भागापर्यंत व्यवसाय शिक्षण पोहोचण्याबरोबर राष्ट्राच्या भविष्यकालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, व्यावसायिक व औदयोगिक गरजा ओळखूनच शिक्षण दिले गेले पाहिजे.

**५) जीवनानुभवाशी निगडीत शिक्षण :--**

गांधीजींच्या कालखंडात शिक्षण पध्दती जीवनाशी निगडीत नव्हती. कोणत्याही विशेष विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करीत होते. परंतू ते ज्ञान जीवनाशी निगडीत नव्हते. गांधीजींना त्याची पूरेपूर जाणीव होतीत यामुळे गांधीजींनी शिक्षण आणि जीवन यांचा अतुट संबंध स्पष्ट केला. मूलोदयोगी शिक्षण पध्दतीत व्यक्तीच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार नैसर्गिक वातावरणात शिक्षण दिले गेले पाहिजे. हस्तकला विषय निवडतांना त्याच्या सामाजिक व नैसर्गिक परिसराचा विचार केला पाहिजे. विषय व्यक्तीच्या जीवनाशी संबंधीत असल्यास त्यास भावी जीवनात त्याचा सहजगत्या उपयोग होऊ शकेल असा गांधीजीचा विचार होता.

**६) मोफत व सक्तीचे शिक्षण :--**

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे यावर गांधीजीचा कटाक्ष होता. प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. शिक्षणावाचून कोणताही विद्यार्थी वंचीत राहता कामा नये. सर्व मूला मूलींना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच शिक्षण सार्वत्रिक असावे. त्यात जात, पंथ, धर्म या नावावर भेदभाव करु नये असे त्यांचे मत होते.

**७) हस्त व्यवसायास प्राधान्य :--**

कोणत्यातरी उत्पादनक्षम अशा हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिक्षण देण्यात यावे असे गांधीजींचे मत होते. हस्तकला शिक्षणाविषयी आपले मत मांडतांना गांधीजी म्हणतात. मुख्य विचार शरीर, बुध्दी आणि आत्मा यांचे संपूर्ण शिक्षण हस्त कौशल्यांद्वारे व्यक्तीला दिले जाते. जे बालकांना शिकवले जाते. या शिक्षणातून बालकांच्या शारीरीक व मानसिक शक्तींचा विकास होतो. या शिक्षणामुळे बालकाची उत्पादनक्षमता तर वाढतेच त्या बरोबर सामुहिक रुपाने कार्य करण्याची संधी उपलब्ध होते.

**८) शिक्षणातून समवाय :--**

शिक्षणातील विविध विषयांमध्ये व त्यातून शिक्षण व जीवन यामध्ये समवाय साधावा असे गांधीजींचे मत होते.

**महात्मा गांधींची शिक्षणाची ध्येये :--**

महात्मा गांधीजींनी जीवनात शिक्षणाला सर्वाधिक महत्व दिलेले आहे. आपले शिक्षणविषयक विचार मांडतांना शिक्षणाची विविध ध्येये सांगितली आहेत. ही ध्येये म्हणजेच त्यांच्या मतानुसार शिक्षणाची कार्ये सुध्दा

म्हणता येतील. ही ध्येये खालील प्रमाणे आहेत.

**१) सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे :--**

व्यक्ती आणि समाज यांचे अस्तित्व व प्रगती ही परस्परावलंबी आहे. म्हणूनच व्यक्ती व समाज यांची ध्येये समान असली पाहिजेत. जे शिक्षण आपण व्यक्तीला देणार आहोत ते समाजाच्या उपयोगी पडणारे असावे, समाजाभिमुख असावे. त्यातून सामाजिक जबाबदारीची जाणीव व्यक्तींमध्ये निर्माण व्हावी. म्हणजेच शिक्षण हे व्यक्ती व समाजाचे हित साधणारे असावे. व्यक्तीला आपल्या हक्कांसोबत कर्तव्याची जाणीव करुन देणारे शिक्षणच समाजाभिमुख असते. असे गांधीजींनी म्हटले आहे.

**२) लोकशाही आदर्श निर्माण करणे :--**

गांधीजींच्या मते, शिक्षणाने बालकांना लोकशाहीप्रधान समाजाचे आदर्श सभासद बनवावे. तसेच शाळा हा असा समाज आहे की ज्यामध्ये बालकांना लोकशाही मूल्यांचा विस्तृत दृष्टीकोण सहनशीलता, चांगजे शेजारी यांच्या नीतीमूल्यांचे शिक्षण दिले जाते. शाळेत बालक सहानुभूती, सेवा, प्रेम, बंधूता, समानता, स्वातंत्र्य इ. सद्‌गुण शिकतात. व्यक्ती आणि देश यांचे कल्याण हे एकमेकांशी पूरक असते. म्हणून जर देशाची प्रगती करावयाची असेल तर भविष्यकालीन पिढीने लोकशाही नागरिकत्वाचे सद्‌गुण विकसीत करावयास पाहिजेच. अर्थातच हा लोकशाही आदर्श निर्माण करणे शिक्षणाचे ध्येय आहे.

**३) स्वतंत्र्येच्या भावनेचा विकास :--**

गांधीजींच्या मते, शिक्षणातून स्वतंत्र व्यक्तीमत्वाचा विकास झाला पाहिजे हे शिक्षणाचे ध्येय असावे. व्यक्ती हा जन्मताच स्वतंत्र असतो आणि त्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा आदर झाला पाहिजे. शिक्षणातून व्यक्तीला या स्वतंत्र्य भावनेचा विकास घडून आला पाहिजे हे गांधीजींना पूर्णतः मान्य होते. म्हणूनच त्यांनी स्वतंत्र भावनेचा विकास हे शिक्षणाचे ध्येय मानले आहे.

**४) सर्वांगिण विकास :--**

शिक्षणाचे सर्वात मुलभूत ध्येय म्हणजे बालकाचा सर्वांगिण विकास करणे हे होय. विद्यार्थ्यांचा शिक्षणातून शारीरीक, मानसिकक, भावनिक विकास करता यायला हवा.

**५) आध्यात्मिक व नैतिक विकास :--**

महात्मा गांधींनी शिक्षणाच्या नैतिक आणि आध्यात्मिक ध्येयावर भर दिला. शिक्षणाच्या नैतिक ध्येयावर भर देतांना गांधींजी असे म्हणतात की, खरे स्वातंत्र्य म्हणजे नैतिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य प्राप्त करणे हे शिक्षणाचे काम आहे. बौध्दिक, आर्थिक आणि राजकीय उत्कर्ष समान पातळीवर करणे ही शिक्षणाची ध्येय होत. विद्यार्थ्यांत असलेल्या विस्तृत बेशिस्तीचा निषेध करतांना गांधीजींनी त्यांना ब्रम्हचर्याचा

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – II August 2016

आदर्श पालन करण्यास सांगितले.

**६) उत्पादनक्षमता विकसीत करणे :--**

देशाच्या प्रगतीसाठी देशातील व्यक्ती स्वावलंबी होणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या सहाय्याने प्रत्येक व्यक्तीने आपला व आपल्या कुटूंबियांचा चरितार्थ चालविला पाहिजे. इतकी उत्पादन क्षमता व व्यावसायिक कौशल्ये शिक्षणाने व्यक्तीत निर्माण केली पाहिजेत. ती विकसीत केली पाहिजे. देशातील बेकारी नष्ट झाली पाहिजे हे शिक्षणाचे ध्येय असावे.

**७) मूलभूत क्षमतांचा विकास :--**

गांधीजींच्या मते, शिक्षणाद्वारे व्यक्तीच्या सुप्त रुपात असलेल्या मूलभूत क्षमतांचा विकास झाला पाहिजे. या विषयी गांधीजी म्हणतात की, शिक्षण याचा अर्थ माझ्या मते बालकांतील आणि व्यक्तीच्या शरीर, मन आणि चैतन्यात जे काही चांगले असेल ते त्याला चारी बाजूने वाट करुन देणे होय. म्हणजेच व्यक्तीला भविष्यातील संघर्षासाठी तसेच जीवनासाठी तयार करण्यासाठी मूलभूत क्षमतांचा विकास करणारे शिक्षण दिले गेले पाहिजे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय असावे.

**अभ्यासक्रम :--**

महात्मा गांधीनीं मुलोदयोगी शिक्षणावर विशेष भर दिला असल्यामुळे त्यांनी अभ्यासक्रमही त्याच अनुषंगाने सूचविलेला आहे. या अभ्यासक्रमाची आखणी वर्धा येथे इ.स. १९३७ रोजी केली होती.

**१) व्यवसाय शिक्षण :--**

स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन हस्त व्यवसायासाठी निवड करावी. यात कृषी, हातसून व हातमाग, मत्स्यपालन, विणकाम, शिवणकाम, लाकूडकाम, धातूकाम, बागकाम, चर्मकाम, मातकाम, फळे व भाजीपाला इ. विविध व्यवसाय शिक्षणाचा समावेश होतो. यामुळे बालकांमध्ये काम करण्याप्रती निष्ठा व स्वावलंबनाची भावना निर्माण होऊ शकेल.

**२) गणित :--**

गणिताच्या अध्ययनाने हस्तकला शिकण्यास, समजण्यास व येणाऱ्या समस्या सोडविण्यास उत्तेजन मिळते. यासाठी अंकगणिताचे प्रश्न व भूमिती समस्या सोडविण्यासाठी गणित शिक्षणाची गरज भासते.

**३) सामाजिक शास्त्रे :--**

या विषयाच्या अभ्यासात इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र या विषयांना स्थान देण्यात आले आहे. या विषयांच्या अभ्यासामूळे बालकात नागरिकतेची भावना वाढीस लागते. आंतरराष्ट्रीय भावनेसही चालना दिली जाते.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – II August 2016

**४) मातृभाषेतून शिक्षण :--**

मातृभाषेचे व्यक्तीच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामूळे मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात आला. मातृभाषेतूनच बालक आपले विचार दुसऱ्यापर्यंत प्रकट करु शकतो. त्यामूळे दुसऱ्याचे विचार व भावना समजू शकतो. त्याचप्रमाणे मातृभाषेतूनच भावनिक विकास होतो. म्हणून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

**५) सामान्य विज्ञान :--**

यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, शरीरशास्त्र इ. विषयांचा समावेश होतो. या शास्त्रांच्या अध्ययनद्वारक बालकात निरिक्षण, परिक्षण व प्रयोग करण्याची क्षमता विकसीत केली जाते. तसेच शास्त्रज्ञांच्या जीवन कार्यावरुन बालकात त्याग, तपस्या व समर्पण भावनेचा विकास होऊ शकतो.

**६) आरोग्य शिक्षण :--**

बालकांना व्यायाम, योगासन, विविध खेळ याद्वारे शिक्षण दिले पाहिजे. त्यामूळे बालकांचे आरोग्य चांगले राहिल. तसेच त्यांना संतुलित आहाराचे महत्व शिक्षणाद्वारे समजावून देणे गरजेचे आहे.

**७) संगीत :--**

शिक्षणात हस्तकला, चित्रकला आणि संगीत एकत्र शिकविण्यात यावे. संगीतामुळे व्यक्तीतला एक वेगळा आनंद मिळतो. तसेच अध्ययनाविषयी अभिरुची वाढीस लागण्यासाठी संगीताचे शिक्षण देणे महत्वाचे आहे.

**८) चित्रकला :--**

सुरुवातीस हस्तकलेच्या स्वरुपात शिकविण्यात यावी नंतर अलंकारीत व आरेखन शिकविण्यात यावे. यामूळे बालकात सौंदर्य दृष्टीची क्षमता वाढीस लागते. त्यांना चित्र काढण्याची व ते रंगविण्याची अभिरुची निर्माण होते.

निष्कर्षत: असे सांगता येईल की, गांधीजींनी शाळेत मूलोदयोगाबरोबर बौध्दिक व मानसिक विकास व्हावा यासाठी गणित, संगीत, कला, सामान्य विज्ञान, इ. विषयही शिकविले जावेत. शाळेत गणितीय प्रयोग तसेच विज्ञानाचे प्रयोगही केले जावेत. यासाठी शाळेत प्रयोगाचे सर्व साहित्य उपलब्ध असावे. प्रयोगशील व कृतीयुक्त शिक्षण मिळेल अशा शाळेचे स्वरुप त्यांना मान्य होते. गांधीजींच्या मते शाळेतून कामगार, नागरिक आणि पालक हे चांगले, सुजाण, उत्पादनक्षम नागरीक निर्माण झाले पाहिजेत. एकूणच गांधीजींची शालेय कल्पना ही त्या काळासाठी आदर्श होती. कारण बेरोजगारी कमी करणे, व्यक्तीला स्वावलंबी बनविणे इ. उद्दिष्टये ही शाळेतूनच पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा गांधीजींची होती.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – II August 2016

**संदर्भ सूची :--**

१) पवार ना. ग. - शिक्षणातील विचारवंत
२) पाटील विनोद, पाटील दिपक - शिक्षण आणि विकास
३) कुंडले म. बा. - शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र
४) पाटील विनोद व्ही. - उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण
४) घोरमोडे के. यु. - शैक्षणिक विचारवंत
५) शर्मा वाय. आर. - आधुनिक शिक्षाशास्त्री
६) पाटील दिपक, पाटील विनोद - शिक्षणाचा विकासात्मक दृष्टिकोण